International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.5 May – June 2023

# ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास : कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा, शाहुवाडी तालुक्याच्या संदर्भासह

**प्रा. डॉ. अशोक शामराव चव्हाण**
*समाजशास्त्र विभाग प्रमुख, श्री विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठ वडगाव, जि. कोल्हापूर.*
*Corresponding Author - प्रा. डॉ. अशोक शामराव चव्हाण*
DOI - 10.5281/zenodo.23340004

**प्रस्तावना:**

जागतिक पातळीवर वर्तमान काळात ज्या विविध सामाजिक समस्यांचे आव्हान आपल्यासमोर उभा आहे त्यातील एक सामाजिक समस्या म्हणजे वृद्धांची समस्या होय. विज्ञान तंत्रज्ञानाची प्रगती, वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती, संपर्क क्षेत्रातील प्रगती इत्यादी अनेक कारणाने जागतिक लोकसंख्या वृद्धांची संख्या वाढत आहे. त्यांच्या वाढत्या संख्येबरोबर वृद्धांच्या शारीरिक, आर्थिक, मानसिक, सामाजिक व आरोग्य विषयक समस्या ही वाढत आहे. यामध्ये ग्रामीण व शहरी वृद्ध, निवृती वेतन मिळणारे व न मिळणारे वृद्ध, विविध देश समाजातील वृद्ध, आर्थिक दृष्ट्या सबळ व दुर्बळ वृद्ध, वृद्धाश्रमातील व घरी असणारे वृद्ध यांच्या उपरोक्त समस्या मध्येही वेगळेपणा दिसून येतो.

भारताच्या संदर्भात विचार करता भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारतातील 60% पेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण आहे. या लोकसंख्येचा उदरनिर्वाह हा प्रामुख्याने शेती व शेतीपूरक व्यवसायावर अवलंबून आहे. या संबंधाने विचार करता भारतातील वृद्धांच्या समस्या खऱ्या अर्थाने जाणून घ्यावयाच्या असतील तर भारतीय ग्रामीण समाजातील निवृती वेतनाचा लाभ न मिळणाऱ्या, अल्पभूधारक शेतकरी वृद्धांच्या समस्या ज्या शहरी वृद्ध व ग्रामीण बागायतदार श्रीमंत शेतकरी वृद्धा पेक्षा वेगळ्या आहेत , म्हणून या समस्यांचा संशोधनात्मक अभ्यास होणे गरजेचे आहे या विचारातून संशोधक अभ्यासकाने"ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास"हा अभ्यास विषय निवडला आहे.

**संशोधनाचा उद्देश:**

१) कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा व शाहुवाडी मधील ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

२) कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा व शाहुवाडी मधील ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांच्या मानसिक__सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे.

३) कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा व शाहुवाडी मधील ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांच्या आरोग्यविषयक समस्यांचा अभ्यास करणे.

**तथ्य संकलन पद्धती:**

प्रस्तुत अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक तथ्य संकलन पद्धती मुलाखत, मुलाखत अनुसूची, निरीक्षण या तंत्रांचा तर दुय्यम तथ्य संकलन पद्धती संदर्भ ग्रंथ, शोध निबंध, नियतकालिके यांचा वापर करण्यात आला आहे.

**अभ्यासाच्या मर्यादा:**

१) सदर अभ्यासासाठी महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील केवळ पन्हाळा व शाहूवाडी तालुक्यातील ग्रामीण वृद्धांचा समावेश आहे.

२) सदर अभ्यासासाठी केवळ अल्पभूधारक व भूमिहीन ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांचा समावेश केला आहे.

३) सदर अभ्यासासाठी निवृती वेतन न मिळणाऱ्या ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांचा समावेश केला आहे.

**गृहीतके:**

ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

**अ) ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास:**

पन्हाळा व शाहूवाडी तालुक्यातील एकूण 40 वृद्ध शेतकऱ्यांचा अभ्यास करतात त्यांच्या आर्थिक समस्या बाबत पुढील तथ्य समोर आली.

**तक्ता क्रमांक ०१: उत्पन्नाचे स्त्रोत**

| अ. क्र | अभ्यासातील ग्रा. वृद्ध शेतकरी संख्या | उत्पनाचे स्त्रोत | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | फक्त शेती | टक्के | शेती व दुग्ध व्यवसाय | टक्के | इतर | टक्के |
| ०१ | ४० | ०२ | ५ % | ३५ | ८७.५% | ०३ | ०७.५% |

सदर संशोधन अध्ययनासाठी एकूण 40 अल्पभूधारक, भूमिहीन वृद्ध शेतकऱ्यांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांचा अभ्यास करता ४० पैकी ०२(५ टक्के) वृद्ध शेतकरी यांचे उत्पन्नाचे स्त्रोत फक्त शेती हे आहे. तर ३५(८७.५ टक्के) वृद्ध शेतकरी यांचे उत्पन्नाचे स्त्रोत शेती व दुग्ध व्यवसाय आहे. तर इतर (कुक्कुटपाल, गृह उद्योग इत्यादी) ०३(७.५ टक्के) लोकांचे उत्पन्नाचे स्त्रोत आहे हे स्पष्ट झाले. याचाच अर्थ ९२.५० टक्के वृद्ध शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत हे शेतीव्यवसाय या केंद्राभोवती फिरते हे स्पष्ट होते.

**तक्ता क्रमांक ०२: आर्थिक निर्णय सत्ता**

| अ.क्र. | अभ्यासातील एकूण ग्रा. वृद्ध शेतकरी संख्या | आर्थिक निर्णयासत्ता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्वत: वृद्ध शेतकर्याकडे | टक्के | फक्त मुलाकडे | टक्के | सामुहिक कुटुंब | टक्के |
| ०१ | ४० | ०३ | ०७.५ % | ३६ | ९०% | ०१ | ०२.५% |

उपरोक्त तक्ता क्रमांक दोन मध्ये ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांच्या कुटुंबात प्राप्त उत्पन्नाचा विनियोग, उत्पन्न प्राप्तीसाठी तसेच खर्चासाठी आवश्यक अधिकच्या आर्थिक गरजेची पूर्तता कशी करावयाची? कोणत्या गोष्टींना खर्च करताना प्राधान्य द्यावयाचे? इत्यादी बाबत म्हणजेच आर्थिक निर्णय सत्ता ही कोणाकडे आहे याचा अभ्यास करता उपरोक्त तक्ता क्रमांक दोन मधील सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण करता ४० पैकी ०३ वृद्ध शेतकऱ्यांच्या कुटुंबात आर्थिक निर्णय सत्ताही संबंधित वृद्ध शेतकऱ्याकडे आहे तर ३६(९० टक्के) कुटुंबात ही सत्ता वृद्ध शेतकऱ्याकडे नाही तर ती त्यांच्या एक किंवा अधिक असणाऱ्या मुलांकडे आहे. केवळ ०१(२.५ टक्के) कुटुंबात आर्थिक निर्णय सामूहिक विचारातून घेतला जातो म्हणजे इथे वृद्धांचे मत ही विचारात घेतले जाते परंतु ९० टक्के कुटुंबात मात्र आर्थिक निर्णय घेताना वृद्धांचे मत विचारात घेतले जात नाही.

*उत्पन्नाचे स्त्रोत व आर्थिक निर्णय सत्ता या संदर्भातून ग्रामीण वृद्ध शेतकरी यांना पुढील आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते.

तक्ता क्रमांक ०१ व तक्ता क्रमांक ०२ मधील सांख्यिकीय विश्लेषणावरून ९० टक्क्यापेक्षा

जास्त कुटुंबाचे आर्थिक स्त्रोत शेती व दुग्ध व्यवसाय आहे. यामुळे

१) भारतातील शेती लहरी हवामानावर अवलंबून आहे हवामानातील नकारात्मक बदलामुळे प्रजन्य काळ व पर्जन्यमान यात झालेल्या बदलामुळे शेती उत्पन्न व दुग्ध व्यवसाय उत्पन्नाच्या बाबतीत अनिश्चित व बेभरवशाचा झालेला आहे.

२) तसेच शेती व दुग्ध व्यवसाय यासाठी चा वाढता खर्च यामुळे उत्पन्नावर नकारात्मक परिणाम होत आहे.

३) तंत्रज्ञान वापरावरील मर्यादामुळे अपेक्षित उत्पन्न मिळत नाही यामुळे

अ) कुटुंबाच्या आर्थिक गरजा पुऱ्या करताना कुटुंबातील वृद्धांना प्राधान्य दिले जात नाही, त्यांच्या गरजांचा विचार प्राधान्याने होत नाही.

ब) कुटुंबातील आर्थिक निर्णय सत्ता ९० टक्के मुलांकडे असलेने वृद्ध शेतकरी आर्थिक परावलंबित्वाचे जीने जगतो प्रत्येक लहान लहान गोष्टीसाठीही त्याला मुलाकडे विनवण्या कराव्या लागतात थोडक्यात आपल्या आर्थिक गरजांसाठी त्याला मुलांच्या इच्छेवर अवलंबून राहावे लागते तो स्वतंत्रपणे याबाबत निर्णय घेऊ शकत नाही

क) वेळेवर व योग्य ठिकाणी वृद्धाची जिथे इच्छा आहे अशा ठिकाणी वृद्धाला आवश्यक सोयीसुविधा मिळतीलच याची शाश्वती नसते याचे कारण हा निर्णय त्याच्या मुलांच्यावर अवलंबून असतो थोडक्यात वैद्यकीय सोयी सुविधेसाठी सुद्धा ग्रामीण वृद्धाला आपल्या मुलांच्या निर्णयावर अवलंबून राहावे लागते ही वस्तुस्थिती आहे.

ड) आर्थिक परावलंबित्व, आर्थिक निर्णय घेण्याचा अधिकार नसणे, थोडक्यात कोणत्याही प्रकारची आर्थिक निर्णय सत्ता नसणे त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या खर्च साठी नेहमी मुलांच्या निर्णयावर अवलंबून राहणे या बाबीमुळे ग्रामीण वृद्ध शेतकऱ्याला एक प्रकारचे नैराश्य येते.

आर्थिक संदर्भातून उपरोक्त समस्या ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांना भेडसावत आहे.

**ब) ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांच्या मानसिक सामाजिक समस्या:**

१) तक्ता क्रमांक ०२ मधील सांख्यिकीय माहितीच्या विश्लेषणावरून ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांच्या कुटुंबातील आर्थिक निर्णय सत्ता ही ९० टक्के कुटुंबात मुलांकडे असल्याने वृद्धाला प्रत्येक गोष्टीसाठी त्यांच्यावर अवलंबून राहावे लागते जीवनभर कष्ट केलेल्या व स्वाभिमानाने जगलेल्या वृद्धाला आपल्या मुलाकडे विनंती करणे, त्याच्यावर अवलंबून राहणे, त्यांच्या मर्जीनुसार

जगणे याचा मानसिक त्रास होतो व नैराश्याला सामोरे जावे लागते.

२) शेती व दुग्ध व्यवसाय तसेच कुटुंबातील विवाह इत्यादी विविध कार्यक्रम याबाबतचे आर्थिक नियोजन तसेच याबाबतचे निर्णय इत्यादी बाबतीत वृद्धाला कुटुंबीयांकडून बेदखल केले जाते. वृद्धाला संबंधित निर्णय प्रक्रियेत त घेतले जात नाही तो केवळ बघायच्या भूमिकेत असतो यामुळे कुटुंबाकडून आपण बेदखल झाल्याची भावना वृद्धांमध्ये वाढीस लागते व त्याला नैराश्य येते.

३) जो समाज पूर्वी आपल्या मतांचा आदर करत होता तसेच कुटुंबाच्या व समाजाच्या विविध कार्यक्रमात आपले मत, आपले विचार विचारत होता व त्याची अंमलबजावणी करत होता तोच समाज आज आपल्याला विविध सामाजिक कार्यक्रमाबाबत काहीही विचारत नाही, निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेत नाही, केवळ एका खुर्चीवर बसून बघ्याच्या भूमिकेत राहिला लागते यामुळे आपले पूर्वीचे जगणे व समाजाकडून मिळणारी वागणूक आणि आज मिळणारी वागणूक याची तुलना वृद्धाच्या मनामध्ये होते यामुळे त्याला नैराश्य येते. आपण पूर्णतः बेदखल झालो आहोत या भावनेने तो निराशेत जातो

४) विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगती, प्रगत शेती व दुग्ध व्यवसाय यामध्ये आलेली आधुनिकता, झालेली प्रगती यामुळे पूर्वीसारखे ग्रामीण वृद्ध शेतकऱ्याच्या अनुभव व ज्ञानाला आता समाज फारसे महत्त्व देत नाही, त्याला शेती व दुग्ध व्यवसाय याबाबत त्याचे अनुभव विचारत नाही याचाही नकारात्मक परिणाम वृद्धांच्या मानसिकतेवर होतो व वृद्धाच्या समाज जीवनावरही याचा नकारात्मक परिणाम होतो व ग्रामीण वृद्ध हळूहळू समाजापासूनही मानसिक व भावनिक दृष्ट्या अलग होतो.

**क) ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांच्या आरोग्यविषयक समस्या:**

१) अस्थिर, अनिश्चित उत्पन्न, आर्थिक निर्णय सत्तेतील बे दखलता यामुळे ग्रामीण वृद्ध शेतकऱ्याला आपल्या वृद्धापकाळातील वेगवेगळया आरोग्य विषयक उपचार वेळेत घेता येत नाहीत.

२) ग्रामीण वृद्ध शेतकऱ्याला उपरोक्त कारणामुळे त्याच्या इच्छेनुसार त्याला योग्य वाटते त्या ठिकाणी उपचार घेताच येतील असे नाही बऱ्याच वेळेला याबाबतचे निर्णय कुटुंबातील इतर सदस्य घेतात काही वृद्धांना तर दवाखान्यात न नेता औषध दुकानातून औषधे वैद्यकीय तज्ञाच्या सल्ल्याशिवाय आणून दिली जातात याचा नकारात्मक परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतो

३) वार्धक्यातील विविध आजारांना समोर ठेवून, त्यांची शक्यता गृहीत धरून प्रतिबंधात्मक

उपाययोजना म्हणून आवश्यक असणारा आहार वृद्धांना विविध कारणामुळे मिळत नाही त्यामुळे वृद्धांना विविध व्याधींना सामोरे जावे लागते

अशाप्रकारे ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांना विविध आर्थिक, मानसिक सामाजिक, आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

**निष्कर्ष:**

१) आर्थिक परावलंबित्वामुळे ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांना विविध आर्थिक व मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

२) आर्थिक निर्णय सत्तेत ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांना कुटुंबाकडून वेदकल केले जाते याचा परिणाम त्यांच्या मानसिक आरोग्यावर होतो

३) वृद्धापकाळातील ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांना त्यांच्या आजारानुसार आवश्यक आहार मिळत नाही त्याचा त्यांच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो.

४) आपणास समाजाने बे दखल केल्याची भावना ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यात प्रकर्षाने जाणवते.

५) कोणतेही निवृती वेतन नसणाऱ्या ग्रामीण वृद्ध शेतकऱ्यांकरिता विविध योजना व त्यांची परिणामकारक अंमलबजावणी यांची गरज आहे.

**संदर्भ :**

१) वसंत कांबळी, "भारतातील कुटुंब व्यवस्था ज्येष्ठांची स्थिती", ज्येष्ठानंद मासिक, ज्येष्ठानंद प्रकाशन जयसिंगपूर

२) डॉ. सुभाष दांडेकर,"चाळीशी नंतरची वाटचाल", मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे

३) सुरेश देशपांडे,"वार्धक्य", दिलीप राज प्रकाशन पुणे

४) मंगला गोडबोले,"वार्धक्य विचार", उत्कर्ष प्रकाशन पुणे.